महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व.आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

आज़ादी का अमृत महोत्सव

क्र.संवैशिवसं/आस्था-३-अतांत्रिक-रवका/ २०३८ /२०२६ दि.०३ /०७/२०२६

*परिपत्रक*

*प्रति,*

संचालनालयाच्या अधिनस्त सर्व संस्थाप्रमुख

अधिष्ठाता/प्राचार्य/अधिक्षक/अधीक्षीका

विषय :- संचालनालय व संचानालयाच्या अधिनस्थ संस्थेतील बायोमॅट्रीक प्रणालीतील उपस्थिती नुसार वेतन अदा करण्याबाबत..

संचालनालय व संचालनालयाच्या अधिनस्त संस्थेत कार्यालयीन उपस्थितीची नोंद करण्यासाठी बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. केंद्र शासनाने कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत National Informatics Centre (NIC) व्दारे विकसित (Aadhaar Enabled Bio-metric Attendance System) प्रणालीचा वापर करण्यात येतो. सदर प्राणाली व्दारे संपूर्ण भारतातील कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत तात्काळ (Real Time) नोंद ठेवता येते. या प्रणालीचा वापर आपल्या संस्थेमध्ये करण्यात यावा तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या बायोमेट्रीक मशीन मध्ये हि प्रणाली कार्यान्वीत करण्यात यावी व आपल्या संस्थेत कार्यरत असणा-या वर्ग १ ते ४ अधिकारी/कर्मचारी यांची बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीनुसार वेतन अदा करण्यात यावे. अध्यापक संवर्गातील अधिका-यांची उपस्थिती ही N. M. C. प्रमाणे नोंदविण्यात येते. व इतर वर्ग १ ते ४ संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची बायोमेट्रीक हजेरी National Informatics Centre (NIC) व्दारे विकसित केलेल्या attendance.gov.in या प्रणालीवर कार्यान्वीत करावी व याबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ३१.१२.२०२० मधील तरतूदीनुसार कार्यवाही करुन बायोमॅट्रीक उपस्थितीनुसार वेतन अदा करण्यात यावे.

याकरीता संस्थेमधील एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी व याबाबतची संपूर्ण जबाबदारी सदर अधिकाऱ्यावर सोपविण्यात यावी.

०३.०७.२६

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण,संशोधन व आयुष

प्रत माहितीसाठी :-

मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मुंबई